*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XV / Issue – I* *ISSN 2277-8063*

# संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी भारत अवलंबित असलेल्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास

**श्री. तेजस दिलीप कुदळे** सहाय्यक प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख, श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सांगली

**डॉ. भीमाशंकर मधुसूदन डहाळके** सहयोगी प्राध्यापक आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख, राजे रामराव महाविद्यालय,जत

मो. क्र. ९८९०२३६४९७ई-मेल आयडी - tejaskudale.3@gmail.com

---

**सारांश** –

दुसऱ्या महायुद्धानंतर, आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संयुक्त राष्ट्राची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्राच्या अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या सुरक्षा परिषदेमध्ये १५ सदस्य असतात. यामध्ये ५ स्थायी सदस्य असून, २ वर्षांच्या मुदतीसाठी १० अस्थायी सदस्यांची निवड केली जाते. संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेपासून, जागतिक स्तरावर घडून आलेल्या बदलांमुळे संयुक्त राष्ट्राच्या भूमिकेतही मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत, तसेच अनेक नव्याने स्वतंत्र झालेली राष्ट्रे, संयुक्त राष्ट्राचे सदस्य झालेले आहेत, परंतु सुरक्षा परिषदेची संरचना पूर्वीप्रमाणेच आहे, त्यामुळे सुरक्षा परिषदेमध्ये जगातील विविध प्रादेशिक विभागांना मिळालेल्या प्रतिनिधित्वात विषमता असल्याचे आढळून येते, त्यामुळे काळानुरूप सुरक्षा परिषदेमध्येही सुधारणा होणे गरजेचे आहे. भारत हा संयुक्त राष्ट्राचा संस्थापक सदस्य असून, अनेक वर्षांपासून सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न करत आहे. भारत सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी अवलंबित असलेल्या परराष्ट्र धोरणाचा चिकित्सक अभ्यास करणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा मुख्य उद्देश आहे.

**बीजशब्द -** संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, स्थायी सदस्यत्व, भारत, परराष्ट्र धोरण, ग्लोबल साऊथ

**संशोधनाचे उद्दिष्ट -**

१. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये, स्थायी सदस्यत्व मिळविण्यासाठी, भारत अवलंबत असलेल्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती -**

या संशोधनासाठी अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार असून, या अभ्यासाच्या माहितीसाठी दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे, यामध्ये विविध वृत्तपत्रांमधील लेख, शोधप्रबंध, अहवाल आणि इंटरनेटवरील साहित्य इत्यादींचा उपयोग करण्यात येणार आहे.

**प्रस्तावना** –

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित व्हावी या दृष्टीने एखादी नवीन संघटना स्थापन करण्याची गरज निर्माण झाली, या गरजेतूनच संयुक्त राष्ट्राची स्थापना करण्यात आली. संयुक्त राष्ट्राच्या संरचनेमध्ये सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्याची महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. सुरक्षा परिषदेमध्ये एकूण १५ सदस्य असून ५ सदस्य राष्ट्रांना (अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन) स्थायी सदस्यत्व देण्यात आले आहे, तर उर्वरित १० सदस्य २ वर्षांच्या मुदतीसाठी अस्थायी स्वरूपात निवडले जातात, याचबरोबर स्थायी सदस्य राष्ट्रांना नकाराधिकार देखील देण्यात आलेला आहे, म्हणजे स्थायी सदस्यापैकी एकाही सदस्य राष्ट्राने एखाद्या प्रस्तावाला असंमती दर्शविल्यास, तो प्रस्ताव पारित होत नाही. १९४५ पासून संयुक्त राष्ट्राची सदस्य संख्या वाढलेली आहे, परंतु त्या प्रमाणात विविध प्रादेशिक विभागांना, सुरक्षा परिषदेमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही. काळानुरूप जागतिक सत्ता संरचनेमध्ये अनेक बदल झालेले असून, भारतासारखी अनेक राष्ट्रे वेगाने प्रगती करत आहेत, तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत, त्यामुळे भारतासारख्या अनेक राष्ट्रांनी सुरक्षा परिषदेमध्ये कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे अशी मागणी केलेली आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमधील कोणत्याही सुधारणांसाठी आमसभेतील मतदान करणाऱ्या एकूण सदस्यांच्या दोन तृतीयांश सदस्यांचा पाठिंबा आणि सुरक्षा परिषदेतील पाचही स्थायी सदस्यांचे समर्थन आवश्यक असते. या अनुषंगाने भारताने संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद सुधारणेच्या रणनीती मध्ये खालील दोन तत्त्वांचा समावेश केलेला आहे.

१. संयुक्त राष्ट्राच्या आमसभेमध्ये जास्तीत जास्त सदस्यांचा पाठिंबा मिळविणे.

२. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील स्थायी सदस्यांचा विरोध कमी करणे.[1]

अशाप्रकारे सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळवणे हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मूलभूत भाग असून त्यासाठी भारत विविध मार्गांनी प्रयत्न करीत आहे.

**संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमधील स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी भारताचे परराष्ट्र धोरण–**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळविण्यासाठी भारत परराष्ट्र धोरणामध्ये खालील बाबींचा अवलंब करीत आहे.

**१. द्विपक्षीय राजनय -** भारताने द्विपक्षीय राजनयाच्या माध्यमातून, सुरक्षा परिषदेमधील पाच स्थायी सदस्यांपैकी, चीन वगळता इतर चार सदस्यांबरोबर चांगले संबंध प्रस्थापित केलेले आहेत, तसेच या चारही सदस्य राष्ट्रांनी वेळोवेळी भारताच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा दिलेला आहे. त्याचबरोबर भारताचे जर्मनी, जपान, ब्राझील या देशांबरोबरही चांगले संबंध असून, या राष्ट्रांनी जी४ च्या माध्यमातून भारताच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा दिलेला आहे.

२. **बहुपक्षीय राजनय -** द्विपक्षीय राजनयाबरोबरच, भारताने विभागीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनाच्या माध्यमातून बहुपक्षीय राजनयामध्येही महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. 'अलिप्ततावादी चळवळीच्या' आणि 'कॉमनवेल्थ ऑफ नेशन' माध्यमातून भारताने बहुपक्षीय राजनयास सुरुवात केली. सद्यस्थितीत देखील भारत जी२०, ब्रिक्स, क्वाड, 'शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन' या संघटनांच्या माध्यमातून बहुपक्षीय राजनयामध्ये भूमिका बजावत आहे.

३. **आघाडी निर्मिती -** संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये, स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी, भारत मूलभूत साधन म्हणून, समान ध्येय असणाऱ्या राष्ट्रांची आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.

- **जी४ गट -** या गटामध्ये भारत, जपान, जर्मनी, ब्राझील या देशांचा समावेश असून, या गटाचा मुख्य उद्देश एकमेकांना सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळावे यासाठी प्रयत्न करणे हा आहे, तसेच स्थायी सदस्यांबरोबरच अस्थायी सदस्यांची वाढ करून, परिषदेला अधिक प्रतिनिधीक बनवणे व आधुनिक संघर्षांना कार्यक्षमतेने हाताळण्यास सक्षम बनवणे हा सुद्धा या गटाचा उद्देश आहे.[2]
- **एल.६९ गट -** या गटामध्ये आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, कॅरिबियन बेटे आणि 'स्मॉल आयलँड डेव्हलपिंग कंट्रीज' मधील विकसनशील देशांचा समावेश होत असून, त्यांचा मुख्य उद्देश संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये सुधारणा करणे हा आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी या गटाच्या, 'बहुपक्षीय जगाचे पुनरुज्जीवन आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सर्वंकष सुधारणा' संबंधित उच्चस्तरीय बैठकीमध्ये सहभाग घेतला.[3]

४. **'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व** – सुरक्षा परिषदेमध्ये 'ग्लोबल साऊथ' मधील चीन वगळता इतर कोणत्याही देशाला स्थायी सदस्यत्व मिळालेले नाही. या प्रदेशामधील लोकसंख्या, तसेच देशांची असणारी लक्षणीय संख्या या आधारावर, सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यत्व मिळावे अशी मागणी या क्षेत्रातील देश वारंवार करीत आहेत. भारत या क्षेत्राचा भाग असून, भारताचे या क्षेत्राबरोबरचे संबंध हे 'सामायिक इतिहास' आणि 'सामायिक आकांक्षा' यावर आधारित आहेत. सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळविण्यासाठी या क्षेत्रामधील बहुतांश राष्ट्रांचा पाठिंबा भारताला मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी भारत या क्षेत्रातील राष्ट्रांबरोबर संबंध विकसित करण्याचा प्रयत्न करीत आहे. या प्रयत्नांचा भाग म्हणून विकासात्मक भागीदारी, आर्थिक सहाय्य, क्षमता विकास या माध्यमातून भारत या प्रदेशातील विकसनशील राष्ट्रांना मदत करीत आहे. मार्च २०२५ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रदेशाच्या सुरक्षा आणि विकासासाठी MAHASAGAR ची सुरुवात केली, त्याचबरोबर भारत या क्षेत्रातील देशांमध्ये शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण, कौशल्य विकास यासंबंधीचे प्रकल्प राबवित आहे.[4] भारताने दक्षिण अमेरिकेतील राष्ट्रांबरोबर चांगले संबंध जोपासले असून, सदस्य संख्येने मोठ्या असलेल्या, 'आफ्रिकन युनियन' बरोबरही भारताने चांगले संबंध प्रस्थापित केलेले आहेत.

५. **जबाबदार राष्ट्राची प्रतिमा -** विविध परिणामकारक उपक्रमांच्या माध्यमातून मागील काही काळात भारताने, जागतिक स्तरावर आपण एक जबाबदार राष्ट्र असल्याचे सिद्ध केले आहे.

- **व्हॅक्सिन मैत्री -** कोविड १९ महामारी च्या काळात भारताने 'व्हॅक्सिन मैत्री' या उपक्रमांतर्गत ९९ देश आणि २ संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांना जवळपास ३०.१२ कोटी इतक्या लसी पुरविल्या. भारताच्या या जलद आणि मोठ्या प्रमाणावरील मदतीमुळे, भारताची जागतिक स्तरावर विश्वासार्ह देश म्हणून ओळख निर्माण होण्यास मदत झाली.
- **आंतरराष्ट्रीय सौर आघाडी -** २०१५ साली पॅरिस येथे झालेल्या परिषदेत, भारत आणि फ्रान्स यांच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय सौर आघाडीची स्थापना करण्यात आली. जवळपास १२० देशांनी या करारावर स्वाक्षरी केली. या आघाडीचा उद्देश, सौर ऊर्जेमध्ये नवीन संशोधनास चालना देणे, निधीची उभारणी करणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य या माध्यमातून हरित ऊर्जेस प्राधान्य देणे हा आहे.
- **आपत्ती काळातील मदत -** मागील ५ वर्षात भारताने १५० पेक्षा अधिक देशांना, मानवीय सहाय्य आणि आपत्ती काळात मदत पुरविली आहे, यामध्ये वैद्यकीय मदत, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, तज्ञ मनुष्यबळ इत्यादींचा समावेश आहे. भारताच्या या प्रयत्नांमधून भारताची एक सक्षम राष्ट्राबरोबरच, जबाबदार राष्ट्र म्हणून प्रतिमा निर्माण होण्यास मदत झालेली आहे.[4]
- **जबाबदार आण्विक राष्ट्र -** भारताकडे जवळपास १७० इतकी अण्वस्त्रे आहेत, तसेच भारताच्या 'आण्विक त्रयी' मध्ये (न्यूक्लिअर ट्रायडमध्ये) जमिनीवरून, समुद्रातून आणि हवेतून अण्वस्त्रांचा मारा करण्याची क्षमता आहे. अशाप्रकारे अण्वस्त्रांनी सक्षम असताना देखील, भारताने अण्वस्त्रांचा प्रथम वापर न करण्याचे धोरण ठरवून, आपण जबाबदार अण्वस्त्रधारी राष्ट्र असल्याचे सिद्ध केले आहे.

६. **आर्थिक सत्ता आणि 'लोकसंख्याविषयक लाभांशाच्या' माध्यमातून राजनय -** जागतिक स्तरावर शीतयुद्धाच्या समाप्तीनंतर, लष्करी सत्तेपेक्षा आर्थिक सत्तेला महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारताने उदारीकरणाचा स्वीकार केल्यानंतर, भारतीय अर्थव्यवस्थेने अतिशय वेगाने प्रगती केलेली आहे. भारताचा जीडीपी ४.३ ट्रिलियन डॉलर असून, भारत जीडीपीच्या क्रमवारीत चौथ्या स्थानावर आहे. भारताची प्रचंड लोकसंख्या आणि क्रयशक्ती यामुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणात ग्राहकवर्ग तयार झाला आहे, त्यामुळे जगातील अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या आणि राष्ट्रे भारताबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करण्यास नेहमीच उत्सुक असतात, या आर्थिक सत्तेचा आणि 'लोकसंख्याविषयक लाभांशाचा' भारत परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून, सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.

७. **संयुक्त राष्ट्राच्या उपक्रमांना समर्थन** –

- **निशस्त्रीकरणाच्या प्रयत्नांमध्ये योगदान -** भारताचे परराष्ट्र धोरण, आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणे या संयुक्त राष्ट्राच्या स्थापनेमागच्या मुख्य उद्देशाला नेहमीच पूरक राहिलेले आहे. स्वातंत्र्यापासूनच भारताने भेदभावरहित मानकांवर आधारित सर्वांगीण निशस्त्रीकरणाच्या उद्दिष्टासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. भारताने 'जैविक शस्त्रास्त्र प्रतिबंध करारावर' (बीडब्ल्यूसी) स्वाक्षरी केलेली आहे, तसेच 'रासायनिक शास्त्रास्त्र प्रतिबंध करारावर'देखील (सीडब्ल्यूसी) भारताने स्वाक्षरी केलेली आहे, परंतु भारताच्या सुरक्षा चिंतांचा योग्य विचार न केल्यामुळे 'सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी कराराला' (सीटीबीटी) भारताने मर्यादित स्वरूपात समर्थन दिलेले आहे, तर 'अण्वस्त्र प्रसार बंदी करार' (एनपीटी) हा भेदभाव करणारा असल्याच्या कारणास्तव भारताने त्यावर स्वाक्षरी केलेली नाही.[1]
- **शांतता मोहिमांमधील सहभाग -** आजतागायत संयुक्त राष्ट्राच्या ५० पेक्षा अधिक शांतता मोहिमांमध्ये, जवळपास २,९०,००० भारतीय सैनिकांनी सहभाग घेतला असून, १८० सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. संयुक्त राष्ट्र शांतता मोहिमांसाठी सैनिकांच्या योगदानामध्ये भारत नेहमीच तिसऱ्या किंवा चौथ्या क्रमांकावर राहिलेला आहे. सद्यस्थितीत देखील संयुक्त राष्ट्राच्या ११ शांतता मोहिमांपैकी ९ मोहिमांमध्ये भारतीय सैनिकांचा सहभाग आहे.[5] अशाप्रकारे संयुक्त राष्ट्राच्या शांतता मोहिमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन भारत आपली स्थायी सदस्यत्वाची दावेदारी प्रबळ करीत आहे.

८. **अस्थायी सदस्यत्वाच्या माध्यमातून स्थायी सदस्यत्वासाठी दावेदारी -** संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेमध्ये निवड केल्या जाणाऱ्या दहा अस्थायी सदस्यांमध्ये भारताची आजपर्यंत (१९५०-१९५१, १९६७-१९६८, १९७२-१९७३, १९७७-१९७८, १९८४-१९८५, १९९१-१९९२, २०११-२०१२ आणि २०२१-२०२२) ८ वेळा निवड झालेली आहे. २०२१-२०२२ या कालावधीसाठी झालेल्या मतदानामध्ये संयुक्त राष्ट्राच्या आमसभेतील १९२ मतदान करणाऱ्या राष्ट्रांपैकी १८४ राष्ट्रांनी भारताच्या समर्थनात मतदान केले आणि भारताने कॅनडासारख्या राष्ट्राचा पराभव केला.[6] अशाप्रकारे भारत वारंवार सुरक्षा परिषदेच्या अस्थायी सदस्यत्वाच्या निवडणुकीमध्ये आपल्या उमेदवारीच्या दावेदारीतून आणि जिंकून येण्याच्या क्षमतेमधून आपण स्थायी सदस्यत्वासाठी प्रबळ दावेदार असल्याचे सिद्ध करीत आहे.

**निष्कर्ष –**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये, स्थायी सदस्यत्व मिळविण्यासाठी भारत आग्रही असून, सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व मिळणे हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा मूलभूत भाग आहे. हे सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी भारत विविध मार्गाने प्रयत्न करीत आहे, त्यामध्ये पी५ राष्ट्रांबरोबरील द्विपक्षीय राजनय, बहुपक्षीय राजनय, जी४ गट तसेच एल.६९ गट यांच्या माध्यमातून आघाडी निर्मितीचा प्रयत्न भारत करीत आहे. व्हॅक्सिन मैत्री, आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, तसेच आपत्ती काळातील मदत याद्वारे भारताने आपण एक जबाबदार राष्ट्र असल्याची प्रतिमा निर्माण केलेली आहे, तसेच भारत 'ग्लोबल साऊथ' चे देखील नेतृत्व करीत आहे. भारत आर्थिक सत्ता आणि लोकसंख्याविषयक लाभांशाचा फायदा मिळावा, यासाठी राजनयाच्या माध्यमातून प्रयत्न करत आहे. संयुक्त राष्ट्राच्या निशस्त्रीकरण आणि शांततेच्या प्रयत्नांमध्ये भारत मोलाचे योगदान देत आहे, त्याबरोबरच संयुक्त राष्ट्राच्या विषयपत्रिकेवरील विविध विकासाच्या आणि पर्यावरणीय उपक्रमांना देखील भारताने समर्थन दिलेले आहे. तसेच सुरक्षा परिषदेमधील अस्थायी सदस्यत्वाच्या माध्यमातून, भारत स्थायी सदस्यत्वासाठी आपली दावेदारी प्रबळ करीत आहे. अशाप्रकारे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेमध्ये स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यासाठी, भारताने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये, विविध बाबींचा समावेश केलेला आहे.

**संदर्भ साहित्य –**

1. Vandana Bhargava (2019) Chapter-V 'India's Claim for Permanent Seat in UNSC' from Thesis on 'UN Security Council, Conflict Resolution and World Peace: A Critical Study', Department of Gandhian and Peace Studies, Panjab University, Chandigarh Retrieved from shodhganga.inflibnet.ac.in
2. Ajaypal Choudhary (15 February 2026) 'India, Germany, Japan and Brazil convene G4 meeting: What is the grouping about', WION
3. 24 September 2022, 'Jaishankar holds first Australia-India-Indonesia trilateral in New York', The Print
4. 18 June 2025, 'Bharat's Global Footprint', Press Information Bureau, Government of India, New Delhi
5. Ministry of External Affairs (8 March 2025) 'India's Legacy in UN Peacekeeping: Leadership, Commitment, and Sacrifice', Research Unit, Press Information Bureau, Government of India, New Delhi
6. 18 June 2020,'India elected non-permanent member of UN Security Council', The Times of India